# पाचवी परीक्षा प्रश्नपत्रिका २०१९

उमेदवाराचे नाव ______________________ वय ________

परीक्षा केंद्र ______________________________________

परीक्षा संचालकाचे नाव ______________________ सही ________

तारीख ______________________

लेखी परीक्षा गुणदान

| प्रश्न | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | एकूण गुण | अंतिम गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राप्त गुण | | | | | | | | | | |
| पैकी गुण | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | ८० | ४० |

तोंडी परीक्षा गुणदान

| | प्रार्थना श्लोक | इतर विषयी माहिती | सामान्य ज्ञान माहिती | कविता व अर्थ | वाचन प्रश्नोत्तरे | श्रवण प्रश्नोत्तरे | अंतिम गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राप्त गुण | | | | | | | |
| पैकी गुण | ५ | ५ | १० | १० | १५ | १५ | ६० |

| | |
|---|---|
| एकूण अंतिम गुण | /१०० |

**प्रश्न १अ) खालील संख्या वाचा. संख्या अंकात / शब्दात लिहा. २ गुण**

| | संख्या | संख्या अंकात लिहा |
|---|---|---|
| १ | एक लाख पंचवीस हजार आठशे सात | |
| २ | त्रेचाळीस हजार दोनशे सदुसष्ट | |

| | संख्या | संख्या शब्दात लिहा |
|---|---|---|
| १ | ७,८७, ३४५ | |
| २ | १०,९०,६३२ | |

**प्रश्न १ब) खालील उतारा वाचा. प्रश्नांची उत्तरे पूर्ण वाक्यात लिहा. ८ गुण**

श्रेया तिच्या आजीला सांगत होती "मला काल स्वप्न पडले. मला पन्नास हजार डॉलर्सची लॉटरी लागली. मी अकरा वर्षाची. एवढ्या प्रचंड पैशाचे काय करायचे? निम्मे पैसे मी कॉलेज शिक्षणासाठी ठेवीन. उरलेल्या पैशाच्या ५०% आई बाबांना देईन. मला वाटले तर नवीन कॉम्पुटर, नवीन सायकल पण घेईन. माझ्या वर्गात कमीत कमी १००० डॉलरचा भरपूर खाऊ वाटेन. खाऊच्या चारपट पैसे आंधळ्या मुलांच्या शाळेसाठी देईन. डोळे उघडले तरी मी दोन्ही हातांच्या बोटावर उरलेले पैसे मोजतच होते."

१. श्रेयाला कोणते स्वप्न पडले ?

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

२. तिने आई बाबांना किती पैसे दिले ती संख्या शब्दात लिहा.

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

३. तीने आंधळया मुलांच्या शाळेला किती पैसे भेट म्हणून देणार होती ?

______________________________________________________________________

______________________________________________________________________

_____________________________________________________________________

४.शेवटी श्रेया जवळ किती पैसे उरले ?

______________________________________________________________________

_____________________________________________________________________

**प्रश्न २) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा. १० गुण**
**( १०- १२ वाक्ये)**

एकदा काय झाले? (एखादा प्रसंग, गंमत, भीती वाटली) / मी चित्रकला स्पर्धा जिंकली.

**प्रश्न ३ अ) खाली दिलेली चित्रे बघा. तुम्ही कॅंपिंगला गेला तर त्याबद्दलची माहिती लिहा. ( ५ – ६ वाक्ये) ५ गुण**






**प्रश्न ३ ब ) खाली दिलेल्या पत्रातील ओळी वाचा. गाळलेल्या जागी योग्य मायना, तारीख व मजकूर लिहून पत्र पूर्ण करा. ( ५-६ वाक्ये ) ५ गुण**

________________________

________________________

________________________

आज मला शाळेत जायला खूपच उशीर झाला. त्यातच मुसळधार पाऊस पण पडत होता. नदीच्या पुलावरील रस्ता बंद केला होता.

-----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------


-----------------------------------------------------------------------------

________________________


**प्रश्न ४ अ ) चित्राशी जुळणारा वाक्प्रचार निवडा व वाक्यात उपयोग करा. ३ गुण**

| | | |
|---|---|---|
| १) |  | ☐ तोंडात बोट घालणे<br>☐ कान फुंकणे<br>☐ गाशा गुंडाळणे |

वाक्य: ____________________

| | | |
|---|---|---|
| २) |  | ☐ कुरकुर करणे<br>☐ पोटात कावळे ओरडणे<br>☐ दाद देणे |

वाक्य: ____________________

| | | |
|---|---|---|
| ३) |  | ☐ हातावर तुरी देणे<br>☐ ढूंकून न पहाणे<br>☐ डोके खाजविणे |

वाक्य: ____________________

**प्रश्न ४ ब ) खालील दिलेल्या वाक्यांना जुळणारी म्हण निवडा. २ गुण**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | दोन मांजरी लोण्याच्या गोळयावरून भांडत होती. माकडाने दोन सारखे भाग करीत करीत सर्व लोणी संपविले. | | काखेत कळसा गावाला वळसा |
| २ | घरात कुठेही सुट्टे पैसे सापडले की निशांत पैशाच्या बरणीत टाकायचा. | | ऐकावे जनाचे करावे मनाचे |
| ३ | काल आजोबा घरभर चष्मा शोधत होते पण चष्मा होता कपाळावर. | | दोघांचे भांडण तिसऱ्याचा लाभ |
| ४ | सगळेजण मिहिरला बारावी नंतर कोणत्या कॉलेजात जावे ते सांगत होते. | | थेंबे थेंबे तळे साचे |

**प्रश्न ४ क ) कंसातील योग्य शब्दाभोवती गोल करा . ५ गुण**

१) मराठी लोकांसाठी ____________ फार महत्वाची करमणूक असते.
( भांगडा / नाटक / मासेमारी )

२) महाराष्ट्रात ज्ञानेश्वर व तुकाराम हे महान ---------- म्हणून ओळखले जातात.
(शिक्षक / संत / राजे )

३)आपण मराठी देवनागरी लिपी वापरतो. त्यापूर्वी ____________ लिपी वापरत असत.
( बोली भाषा / संस्कृत / मोडी)

४) दिवाळीत बहिणीने भावाला ओवाळायचे ही _____________आहे.
( परंपरा / घटना / गोष्ट )

५) भारतीय खेळात ____________हा प्रकार खूप प्रसिद्ध आहे.
( बेसबॉल / टेनिस / कुस्ती )

**प्रश्न ५ अ) अधोरेखित शब्दांच्या जागी, त्या शब्दाच्या विरुद्धार्थी शब्द वापरा आणि आवश्यक ते बदल करून अर्थपूर्ण वाक्य लिहा.** **४ गुण**

उदाहरण:

यशला *जास्त* मते मिळाली म्हणून तो शाळा प्रमुखाची निवडणूक *जिंकला*.

यशला *कमी* मते मिळाली म्हणून तो शाळा प्रमुखाची निवडणूक *हरला*.

१) बुध्दीबळाचा डाव फारच अवघड होता म्हणून रमेशला वाईट वाटले.

___________________________________________________________

२) त्या हॉटेलातल्या चादरी अस्वच्छ होत्या म्हणून आम्हाला ते हॉटेल नापसंत होते.

___________________________________________________________

**प्रश्न ५ब) अधोरेखित शब्दांच्या जागी, त्या शब्दाच्या समानार्थी शब्द वापरा आणि आवश्यक ते बदल करून अर्थपूर्ण वाक्य लिहा.** **४ गुण**

उदाहरण:

मांजराचे पिल्लू हरवल्यामुळे राधा *फार दु:खी* झाली.

मांजराचे पिल्लू हरवल्यामुळे राधा *खूप उदास* झाली.

१) सूर्यास्त झाल्यावर रस्त्यावरील दिवे लागले व सगळीकडे प्रकाश पसरला.

___________________________________________________________

२) बेसबॉलचा कोणता खेळाडू चांगला खेळला यावरून बाबा व काका यांचा जोरात वाद सुरु झाला.

___________________________________________________________

**प्रश्न ५ क) योग्य जागी कंसातील विरामचिन्हे वापरा. उतारा परत लिहा. २ गुण**
**( पूर्णविराम . स्वल्पविराम, उद्गारचिन्ह ! प्रश्नचिन्ह ? अवतरणचिन्ह " " )**

रमेशचे वडील म्हणाले रामायण कोणी लिहिले ठाऊक आहे का तुला त्यांनी सांगितले रामायण लिहिणारा लेखक एक अडाणी कोळी होता नंतर रमेश म्हणाला भिंतीवर चढणारा पण कोळीच असतो ना तेंव्हा रमेशचे वडील जोरात हसले हा हा हा

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**प्रश्न ६) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) वायुप्रदूषण कमी करण्यासाठी काय करावे ? दोन वाक्ये लिहा. **२ गुण**

______________________________________________

______________________________________________

२) अनोळख्या जागी पोहताना कोणते नियम पाळावेत ? दोन वाक्ये लिहा. **२ गुण**

______________________________________________

______________________________________________

३) प्लॅस्टीकचा वापर कमी करण्यासाठी काय करावे? दोन वाक्ये लिहा. **२ गुण**

______________________________________________

______________________________________________

४) सूर्य, पृथ्वी व चंद्र एकाच रेषेत येतात. **२ गुण**

अ ) सूर्य व पृथ्वीच्या मध्ये चंद्र असतो त्याला ____________ म्हणतात.

ब ) सूर्य व चंद्राच्या मध्ये पृथ्वी असते त्याला ____________ म्हणतात.

५) बरोबर ✔ किंवा चूक ✖ लिहा. **२ गुण**

अ ) महासागरात भूकंप झाल्यामुळे त्सुनामी होते. बरोबर चूक

ब ) चक्रीवादळात काठी घेऊन बाहेर पडावे. बरोबर चूक

**प्रश्न ७ अ) दिलेल्या शब्दाचे योग्य रूप वापरून गाळलेल्या जागा भरा.** **६ गुण**

उदाहरण: (फूल)- फुलांची आवड असली की फुलं हवीहवीशी वाटतात.

शब्द – स्त्री

आज संक्रांतीला ____________ हळदीकुंकवाचा समारंभ होता. कार्यक्रमात ____________ द्यायला भेटवस्तू आणल्या होत्या. सगळ्या ____________ काळ्या साड्या घातल्या होत्या. गप्पागोष्टी, तिळगूळ व खरेदी यांत सर्व ____________ मग्न होत्या.

एकूण ____________ खूप मजा चालली होती.

“ ____________ , शांत रहा ” ही सूचना कोणीच ऐकली नाही.

**प्रश्न ७ ब) खाली दिलेल्या वाक्यासाठी योग्य दर्शक शब्द निवडा. जोड्या लावा. २ गुण**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | योसेमतीचे ते उंच पहाड किती सुंदर होते. | | दीर्घायुषी |
| २ | तनुजाला ब्लुबेरी आवडत नाही. | | मनमिळाऊ |
| ३ | धोंडो केशव कर्वे १०० वर्षे जगले. | | अवर्णनीय |
| ४ | आरुष सगळ्यांशी चांगला वागतो. | | नापसंत |

**प्रश्न ७ क ) खाली दिलेल्या वाक्यांसाठी योग्य जोडशब्द निवडा. जोड्या लावा. २ गुण**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | खोलीत किती घाण व धूळ झाली आहे. | | इकडेतिकडे |
| २ | तो काय बोलत होता ते मला कळतच नव्हते. | | केरकचरा |
| ३ | माझी मावशी कधी कधी येते. | | उलटसुलट |
| ४ | मी जोशी यांचा पत्ता शोधत होतो. | | अधूनमधून |

**प्रश्न ८ अ) खालील उताऱ्याचे मराठी मध्ये भाषांतर करा. ३ गुण**

Have you ever visited a shop where they make different kinds of chocolates? Or maybe visit the factory at Hershey, Pennsylvania, Milton Hershey made first chocolate in Feb.9, 1894. The name “Hershey” is famous throughout the world for chocolates, candies, cookies and cakes too. Even today, a delicious chocolate means Hershey.

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

**प्रश्न ८ ब) खालील उताऱ्याचे इंग्लीश मध्ये भाषांतर करा.** **३ गुण**

सोनियाला वाटते की सर्व मुंग्यांना एकमेकांची भाषा समजते. जेव्हा एखाद्या मुंगीला मेलेला किडा सापडतो व तिला तो एकटीला नेता येत नाही तेव्हा ती जाते आणि दुसऱ्या मुंगीला मदत करायला घेऊन येते. दोघी मिळून त्या किड्याला दूर ओढत नेतात. इतर मुंग्या त्यांना भेटल्या तर विचारत असतील “तुम्हाला काही मदत हवी का?”

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

**प्रश्न ८ क) वाक्यातील चुकलेल्या शब्दांभोवती गोल ( ) करा. योग्य शब्द लिहा.** **४ गुण**

उदाहरण – ऐका एका

मीरा व तन्वी ऐका आठवड्यासाठी “गर्ल गाईड” शिबिराला गेइल्या. जंगलात खूप जाडे होती. मीरा म्हनाली , “ आपण झाडामदे चढू.” सकाल झाली. सगळेजण लावाकर उठले. निरनिराळे पक्कशी पाहायला गेले. निल्या रंगाचे ब्लूजे उडत होते.